“चांदा ते बांदा” कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर राष्ट्रीयकृत बँकेत “चालू खाते” (Current A/c) उघडण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : चांबांयो २०१८/प्र.क्र.०८/का.१४१८
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०५ मार्च, २०१८.

<u>वाचा:-</u>
१) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.डिएपी १०१५/प्र.क्र.५१/१४८१, दिनांक २९/०६/२०१६.
२) नियोजन विभाग, शासन ज्ञापन, क्र.चांबांयो २०१७/प्र.क्र.१३४/१४१८, दिनांक ०९/०२/२०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

चंद्रपूर व सिंधुदूर्ग या दोन जिल्ह्यांमध्ये प्रथमत: सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीसाठी “रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट” हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यासाठी “चांदा ते बांदा योजना” राबविण्यास नियोजन विभाग शा.नि.क्रमांक डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दिनांक २९/०६/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये या योजनेबाबत निश्चित करण्यात आलेली उद्दीष्ट्ये, निवडण्यात आलेली विकास क्षेत्रे, कार्यक्रमाची अंमलबजावणीची पध्दत प्रशासकीय खर्च आणि कार्यक्रमाचे संनियंत्रण व मुल्यमापन इ. बाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

२. नियोजन विभागाकडून “चांदा ते बांदा योजना” अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षासाठी राज्यस्तरीय समितीने मंजूर केलेल्या या दोन जिल्ह्यांच्या विकास आराखड्यांच्या अनुषंगाने मागणी क्र. ओ-७,३४५१ चांदा बांदा योजने अंतर्गत विकास योजना राबविणे (३४५१A०२८) या लेखाशिर्षाखाली रु.१४५.०० कोटी व चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये “रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट” हा कार्यक्रम राबविणेबाबत (३४५१A०१९) या लेखाशिर्षाखाली रु.५.०० कोटी तसेच मागणी क्र.ओ-१०, चांदा बांदा योजनेअंतर्गत विकास योजना राबविणेबाबत ४५१५०९०५ या लेखाशिर्षाखाली रु.४५.०० कोटी असा एकूण रु.१९५.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

३. “चांदा ते बांदा योजना” संदर्भात मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामिण) वित्त व नियोजन व अध्यक्ष, राज्यस्तरीय समिती यांच्या स्तरावर सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्र व इतर प्रस्तावाचे विषयाच्या संदर्भात दि.१५/०१/२०१८ रोजी आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस अपर जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग व संबंधित प्रशासकीय विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी “चांदा ते बांदा योजना” अंतर्गत मंजूर आराखड्यातील कामांकरीता वितरीत केलेला निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात “बीडीएस” द्वारे केंद्र शासनाचे अधिनस्त कार्यालय व स्वायत्त शैक्षणिक संस्था जसे, खादी व ग्रामोद्योग आयोग, कॉयर बोर्ड, मरीन फिशरीज, मरीन प्रोडक्ट एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ऑथॉरिटी इत्यादी व कोकण कृषी विद्यापीठ, तसेच राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम जसे, एम.एस.एस.आय.डी.सी, खादी ग्रामोद्योग मंडळ यांना निधी बी.डी.एस. वर वितरीत करता येत नसल्याने सदर निधी खर्च करण्यास अडचणी उद्भवतील असे निदर्शनास आणले. त्यामुळे “चांदा ते बांदा योजने” अंतर्गत मंजूर आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन्ही जिल्ह्यांकरिता जिल्हास्तरावर वित्त विभागाच्या मान्यतेने राष्ट्रीयकृत बँकेत ‘चालू खाते’ (Current A/c) उघडण्यात यावे

जेणेकरून संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणाना निधी उपलब्ध करणे सोईचे होईल व "चांदा ते बांदा योजना" अंतर्गत मंजूर विविध कामे प्रभावीरित्या राबविणे शक्य होईल, असे निश्चित करण्यात आले. त्यास अनुसरून चांदा ते बांदा हा पथदर्शी कार्यक्रम सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यासाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेत 'चालू खाते' (Current A/c) उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

"चांदा ते बांदा योजना" अंतर्गत चंद्रपूर व सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्याकरीता, शासनाकडून मंजूर करण्यात येणारा निधी कामाच्या प्रत्यक्ष प्रगतीप्रमाणे टप्प्या टप्प्याने केंद्र शासनाचे अधिनस्त विभाग व यंत्रणा व कार्यालय व राज्य शासनाचे अधिनस्त विविध प्राधिकरण व महामंडळ, स्वायत्त संस्था आणी संबंधित जिल्हास्तरीय कार्यालय यांना सुलभ पध्दतीने निधी उपलब्ध करणे शक्य व्हावे, याकरीता राष्ट्रीयकृत बँकेत 'चालू खाते' (Current A/c) उघडण्यास खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) राष्ट्रीयकृत बँकेत 'चालू खाते' (Current A/c) हे जिल्हाधिकारी व जिल्हा नियोजन अधिकारी यांचे संयुक्त नांवाने राहील. या चालू खात्यामध्ये (Current A/c) केवळ "चांदा ते बांदा" योजनाअंतर्गत शासनाकडून प्राप्त होणारा निधी जमा करण्यात येईल. निधी वितरीत करताना तो वित्त विभागाचे सर्वसाधारण मार्गदर्शक निदेशाप्रमाणे पुर्णत: वितरीत न करता कामाच्या प्रत्यक्ष प्रगतीच्या प्रमाणातच जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांनी राज्यस्तरीय समितीच्या निर्णयाप्रमाणे संबंधित जिल्हास्तरीय कार्यालयाला वितरीत करावा.

ब) राष्ट्रीयकृत बँकेत 'चालू खाते' (Current A/c) चांदा ते बांदा योजना चालू असेपर्यंत म्हणजेच सन २०१९-२० या वित्तीय वर्षापर्यंत उघडण्यात येईल. तसेच चांदा ते बांदा योजनेचे सन २०१९-२० पर्यंत काम पूर्ण झाल्यावर चालू खाते (Current A/c) बंद करण्यात येईल व व्याज आणि शिल्लक असलेली रक्कम यांचा ताळमेळ जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांनी घेऊन निश्चित होणारी रक्कम शासकीय लेख्यामध्ये जमा करण्यात यावी.

क) राष्ट्रीयकृत बँकेत 'चालू खाते' (Current A/c) मध्ये चांदा ते बांदा योजनेअंतर्गत आराखड्यातील मंजूर कामांकरिता शासनाकडून वेळोवेळी वितरीत करण्यात आलेला निधी व त्यावर मिळणारे व्याज याकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग हे प्रचलनास जबाबदार असतील. तसेच 'चालू खाते' (Current A/c) च्या लेखापरिक्षणाची जबाबदारी व विनियोजन लेख्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांची राहील. या संदर्भात जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांना आवश्यकतेप्रमाणे अंतर्गत लेखा परिक्षण (Internal Audit) करीता सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांची नियुक्ती करता येईल.

"चांदा ते बांदा योजना" अंतर्गत शासनाकडून उपलब्ध करुन दिला जाणारा निधी राष्ट्रीयकृत बँकेत चालू खात्यामध्ये (Current A/c) तात्काळ जमा करण्यात येईल. तसेच एकूण उपलब्ध निधी व व्याज तसेच आराखड्यामध्ये मंजूर कामांच्या प्रगतीनुसार लागणाऱ्या निधीचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल दर महिन्यांनी राज्यस्तरीय समितीकडे जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांनी सादर करावा.

२. नियोजन विभागाचे संदर्भ क्र.२ येथिल शासन ज्ञापनान्वये सन २०१७-१८ करिता वितरीत केलेला निधी जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग यांनी “चांदा ते बांदा योजना” करिता उघडण्यात येणा-या राष्ट्रीयकृत बॅंकेत चालू खात्यामध्ये (Current A/c) दि. ३१ मार्च, २०१८ पुर्वी जमा करावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ३६/२०१८/कोषाप्रशा-५, दि.१५.०२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेताक २०१८०३०५१७२५२४०५१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.03.06 12:16:22 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मा. मंत्री आणि राज्यमंत्री,
६. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा, विधान भवन, मुंबई,
७. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई,
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपूर/सिंधुदुर्ग,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर /सिंधुदुर्ग,
१३. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण विभाग व नागपूर विभाग,
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर /सिंधुदुर्ग,
१५. महालेखापाल, महाराष्ट्र -१ व २ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
१६. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,
१८. कार्यासन १४१८ (निवडनस्ती).